पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ५११ दिनांक - ०८/०७/२०२३**

## सहायक पोलीस आयुक्त,कार्यालय गुन्हे- १,पुणे शहर

### ऑल आऊट कोम्बींग ऑपरेशन दरम्यान दरोडा टाकण्याचे तयारीत असलेल्या सराईत गुन्हेगारांना गुन्हे शाखेद्वारे फायरिंगने चोख प्रतिउत्तर

मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर श्री. रितेश कुमार, यांनी पुणे पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रामध्ये कोंबिंग ऑपरेशन करुन,गुन्हेगारांना चेकींग करुन प्रतिबंधक कारवाई करणे,तसेच हॉटेल/लॉजेस/ढाबे, एस. टी. व बस स्थानके, रेल्वे स्टेशन, तसेच सार्वजनिक ठिकाणी आढळून येणारे संशयीत इसम/घटना इत्यादी कसून तपासणी करणे बाबत आदेश दिले होते.त्याप्रमाणे पुणे पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रामधे गुन्हे शाखा व पोलीस ठाणे कडील अधिकारी व अंमलदार यांची पथके स्थापन करुन पुणे शहरातील वेगवेगळया परीसरात दि.०७/०७/२०२३ रोजी २०.०० वा. ते दि.०८/०७/२०२३ रोजी ०१.०० वा. पर्यत ऑल आऊट/कोबिंग ऑपरेशनचे आयोजन करण्यात आले होते. सदर कारवाई दरम्यान पुणे शहरात गंभीर स्वरूपाच्या गुन्हयांना प्रतिबंध करण्यासाठी जास्तीत जास्त चेकिंग करून कारवाई करणेबाबत आदेशीत केले होते.

वारजे माळवाडी पोलीस स्टेशनच्या हद्दित सपोआ गुन्हे-१ श्री.सुनिल तांबे यांचे मागदर्शनाखाली युनिट-३ चे अधिकारी व कर्मचारी कोंबींग ऑपरेशन राबवित असताना दि.०८/०७/२०२३ रोजी ०१.०० वाजण्याचे दरम्यान पोलीस अंमलदार प्रकाश कट्टे यांना म्हाडा कॉलनीच्या दिशेने म्हाडा वसाहतीजवळ सर्व्हिस रोडवरील रोझरी स्कुलच्या बाजुला असलेल्या वापरत नसलेल्या बसस्टॉपवर अंधारामध्ये ९ ते १० इसम दोन ग्रुपमध्ये संशयास्पद हालचाली करत असल्याचे दिसून आले.

सदर संशयीत इसमांच्या रात्री ०१.०० वा.सुमारास दिसणा-या हालचालींवरून सपोआ श्री.सुनिल तांबे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.श्रीहरी बहिरट, पोलीस उप निरीक्षक राहुल पवार, युनिट-३ कडील स्टाफ यांनी सदर इसमांना ताब्यात घेण्यासाठी दोन टीम करून त्यांच्या दिशेने जात असताना एका संशयीत इसमाने पोलीसांच्या दिशेने त्याचेजवळील पिस्तुल रोखुन फायर करणार त्याचवेळी सपोआ सुनिल तांबे यांनी पोलीसांच्या संरक्षणार्थ त्याचे दिशेने त्यांचे सर्व्हिस पिस्टलमधुन फायर केले व त्यांचेबरोबर असणा-या पोलीस उप निरीक्षक पवार यांनी देखील एक राऊंड फायर केला. पोलीसांनी प्रत्युत्तरादाखल अचानक केलेल्या फायरिंगमुळे आरोपी अंधाराचा फायदा घेवुन पळुन जात असताना त्यास त्याचे पिस्टलसह व इतर ४ साथीदारांना हत्यारासह ताब्यात घेवुन इतर आरोपींचा वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीहरी बहिरट यांनी व त्यांचे टीमने पाठलाग सुरू केला. सदरचा पाठलाग चालु असताना त्यातील एका आरोपीने पोलीस शिपाई प्रकाश कट्टे याच्या दिशेने कोयता फेकुन मारला असता तो त्याच्या उजव्या पायाच्या नडगीस लागुन त्यास जखमी केले.

पोलीसांनी प्रत्युत्तरादाखल एसएलआर रायफलमधुन तीन राऊंड आरोपींच्या दिशेने फायर केले असता ४ आरोपींनी म्हाडा कॉलनीच्या समोरील बाजुस असलेल्या टेकडीवरून जंगलात पळ काढला.त्यानंतर गुन्हे शाखेने सहकारी अधिकारी व स्टाफच्या मदतीने तेथे कोम्बिंग ऑपरेशन राबवुन फरार झालेल्या ४ संशयीतांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला असुन फिल्डवर नेमण्यात आलेल्या गुन्हे शाखेच्या टीमच्या मदतीने त्यांचा शोध चालु आहे.

सदर कार्यवाही दरम्यान रेकॉर्डवरील आरोपी नामे १) अमोल अंकुश लामतुरे वय २७ वर्षे रा. आंनदनगर पोस्ट ऑफिसजवळ, लातुर सध्या रा. पुणे रेल्वे स्टेशन परीसर २) राजु पुनीचंद शिंदे वय ३९ वर्षे रा. पुणे स्टेशन परीसरात ३) सचिन मारूती खैरे वय ३० वर्षे रा. मु. पो. भुगाव, ता. मुळशी, जि. पुणे ४) गणेश मारूती खैरे वय ३२ वर्षे रा. स. नं. ३३, सुभाष बराटे चाळ, दत्तनगर, वारजेगाव, पुणे ५) अक्षय उध्दव सोळुंके वय २२ वर्षे रा. स. नं. ३३, सुभाष बराटे चाळ, दत्तनगर, वारजेगाव, पुणे हे मेकॅड्रॉनिक्स या इमारतीच्या शेजारी असलेल्या एसबीआय बॅकेच्या एटिएमवर दरोडा टाकण्याचे तयारीत असताना त्यांना अटक करून त्यांचेकडुन एकुण २७,१००/- रू किंचा मुद्देमाल त्यामध्ये एक अग्निशस्त्र, ४ जिवंत राऊंड, २ लोखंडी कोयते, लोखंडी पाईप, लोखंडी कटावणी, हातोडी, स्क्रुड्रायव्हर, पक्कड व कटर अशी साधने जप्त करण्यात आली आहेत. सदरबाबत वारजे माळवाडी पोलीस स्टेशन येथे गु.रजि.नं. २८६/२०२३ भा.दं.वि.कलम ३०७, ३९९, ४०२, भारतीय हत्यार कायदा कलम ३ (२५), ४ (२५), व महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३)सह १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री.श्रीहरी बहिरट करीत असुन आरोपींना मा.न्यायालयाने दिनांक १०/०७/२०२३ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड दिले आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त श्री रितेश कुमार, मा.सह पोलीस आयुक्त श्री.संदीप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त गुन्हे रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप आयुक्त, गुन्हे श्री.अमोल झेंडे, मा.सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे-१ श्री सुनिल तांबे यांचे मार्गदर्शनाखाली युनिट-३ गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्रीहरी बहिरट,पोलीस उप निरीक्षक राहुल पवार,पोलीस उप निरीक्षक अभिजीत पाटील, पोलीस अंमलदार संतोष क्षीरसागर, शरद वाकसे, राजेंद्र मारणे, सुरेंद्र साबळे, प्रकाश कटटे, सुजित पवार, संजीव कळंबे, ज्ञानेश्वर चित्ते, किरण पवार, साईनाथ पाटील, सतिश कत्राळे, साईकुमार कारके, प्रताप पडवाळ, संतोष डोळस, सुनिल राऊत, नितीन काळे यांनी केलेली आहे.